राज्य शासकीय चतुर्थश्रेणी संवर्गामधील कर्मचाऱ्यांच्या गणवेशाच्या शिलाई भत्ता दरात व धुलाई भत्ता दरात सुधारणा करणेबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**सामान्य प्रशासन विभाग**
**शासन निर्णय क्र. : गणवेश- २०२४/प्र.क्र.६७ / जपुक (२९)**
**मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.**
दिनांक : १० ऑक्टोबर, २०२४.

**पहा :**
१) शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्रमांक सीएलओ-१०७०, एक्सएल, दिनांक ९ ऑक्टोबर, १९७०.
२) शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्रमांक सीएलओ-१०८१/१६४५/५-८१/२९, दिनांक १ सप्टेंबर,१९८२.
३) शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्रमांक सीएलओ-१०८३/२५१४/२९, दिनांक १९ सप्टेंबर,१९९०.
४) शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्रमांक पोशाख-१०८५/८९-८५/२९, दिनांक १५ एप्रिल, १९९१.
५) शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्रमांक गधुभ-३५९४/प्र.क्र.३१/९५/२९, दिनांक ८ फेब्रुवारी, १९९६.
६) शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्रमांक गणवेष-३४०३/प्र.क्र.१२६/२००४/२९, दिनांक २६ मार्च, २००८.
७) शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्रमांक गणवेष-३४०३/प्र.क्र.१२६/२००४/२९, दिनांक ८ एप्रिल, २००८.

**प्रस्तावना** :- राज्य शासकीय चतुर्थश्रेणी संवर्गातील कर्मचाऱ्यांना पुरविण्यात येणाऱ्या गणवेशाच्या विविध बाबींमध्ये म्हणजेच शिलाई दरात सुधारणा करणे, महिला कर्मचाऱ्यांच्या ब्लाऊजचे शिलाई दर वाढविणे, गणवेश धुलाई भत्ता दरात सुधारणा करणे तसेच गरम कपड्याच्या गणवेशाच्या शिलाई दरात वाढ करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय** :-

राज्य शासकीय चतुर्थश्रेणी संवर्गातील कर्मचाऱ्यांना पुरविण्यात येणाऱ्या गणवेशाच्या विविध बाबींमध्ये म्हणजेच शिलाई दरात सुधारणा करणे, महिला कर्मचाऱ्यांच्या ब्लाऊजचे शिलाई दर वाढविणे, गणवेश धुलाई भत्ता दरात सुधारणा करणे तसेच गरम कपड्याच्या गणवेशाच्या शिलाई दरात खालीलप्रमाणे वाढ करण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

| बाब | कालावधी | शा.नि.दि.२६/०३/२००८ नुसार दर | सुधारीत दर |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| शर्ट पँट शिलाई दर | दोन वर्षातून एकदा | रु. २५०/- प्रत्येक जोडीसाठी (एक शर्ट व एक पँट) | रु. ७५०/- प्रत्येक जोडीसाठी (एक शर्ट व एक पँट) |
| ब्लाऊजचा शिलाई दर | दोन वर्षातून एकदा | रु. ५०/-(प्रत्येक ब्लाऊज साठी) | रु. २५०/- (प्रत्येक ब्लाऊज साठी) |
| लोकरीचा गणवेश शिलाई दर | चार वर्षातून एकदा | रु. ३५०/- | रु. १५००/- |
| धुलाई भत्ता | दर महा | रु. ५०/- | रु.२५०/- |

३. वरीलप्रमाणे दर सुधारीत केल्यामुळे येणारा वाढीव खर्च संबंधित विभाग / कार्यालयाने त्यांच्या मंजूर अनुदानातून भागवावा.

४. सुधारीत दर शासन निर्णय निर्गमित केल्याच्या दिनांकापासून अंमलात येतील.

५.	उपरोक्त विवरणपत्रातील दरास खालील अटींच्या अधीन मान्यता देण्यात येत आहे.

i	राज्य शासकीय चतुर्थश्रेणी संवर्गातील गणवेशपात्र कर्मचाऱ्यांना गणवेश शिलाई व धुलाई भत्ता अनुज्ञेय करताना, या कर्मचाऱ्यांकडून कार्यालयीन वेळेत नियमितरित्या गणवेश परिधान करण्यात येत असल्याची तपासणी करण्याची / लक्ष ठेवण्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधीत प्रशासकीय / नियंत्रण अधिकारी यांची राहील.

ii	गणवेश शिलाई व धुलाई भत्त्याची देयके चतुर्थश्रेणी संवर्गातील गणवेशपात्र कर्मचाऱ्यांकडून संबंधित कार्यासनास विहित कालावधीत सादर करण्यात येत असल्याची खातरजमा करण्याची सर्वस्वी जबाबदारी विभागाची राहील. तसेच या कर्मचाऱ्यांना गणवेश शिलाई दराची व धुलाई भत्त्याची रक्कम प्रदान करताना सा.प्र.वि. शासन निर्णय दि. २६/०३/२००८ च्या परिच्छेद ५ नुसार कार्यवाही करण्याची दक्षता घेण्याची जबाबदारी संबंधित विभागांची राहील.

iii	बाह्ययंत्रणेने भरण्यात येणाऱ्या चतुर्थश्रेणी पदांना प्रस्तावित गणवेश शिलाईभत्ता, धुलाईभत्ता अनुज्ञेय असणार नाही, याची दक्षता घेण्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित विभागाची राहील.

iv	विभागातील तसेच मंत्रालयीन अन्य विभागातील चतुर्थश्रेणी संवर्गातील गणवेशपात्र कर्मचाऱ्यांच्या संख्येची खातरजमा करण्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित विभागाची राहील.

v	सुधारीत दरामुळे येणारा वाढीव खर्च विहित लेखाशिर्षांतर्गत मंजूर अनुदानातून भागविण्याची दक्षता घेण्याची जबाबदारी संबंधित विभागांची / नियंत्रण अधिकारी यांची राहील.

६.	सदर शासन निर्णयानुसार ज्या चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांना शिलाई भत्ता, धुलाई भत्ता इत्यादी देण्यात येणार आहे, त्या चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांची संख्या व त्यांच्यावर होणाऱ्या आर्थिक भाराची गणना सर्व मंत्रालयीन विभागांनी त्यांच्या खुद्द आस्थापनेवरील व त्यांच्या अधिपत्याखालील कर्मचाऱ्यांची एकत्रित माहिती या विभागास एका महिन्यात सादर करावी.

७.	वरील शासन निर्णय वित्त विभागाच्या सहमतीने व त्यांच्या अनौ.संदर्भ क्रमांक ५५५७/ व्यय-४ दि. ३०.०९.२०२४ अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

८.	सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२४१०१०११५३०१५५०७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**( सु. मो. महाडिक )**
**सह सचिव, सामान्य प्रशासन विभाग**

**प्रत –**

मा. राज्यपाल यांचे सचिव,
मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,
मा. उपमुख्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
सर्व मंत्री/ राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव/ स्वीय सहायक,
मुख्य सचिवांचे सह सचिव,
सर्व अपर मुख्य सचिव/ प्रधान सचिव / सचिव,
* प्रबंधक, मुळ न्याय शाखा, उच्च न्यायालय, मुंबई/ नागपूर/ छत्रपती संभाजीनगर,
* प्रबंधक, उच्च न्यायालय, अपील शाखा, मुंबई/ नागपूर/ छत्रपती संभाजीनगर,
* सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,

* सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई
* प्रबंधक, लोकायुक्त व उप लोकायुक्त यांचे कार्यालय, मुंबई
सर्व मंत्रालयीन विभाग,
सर्व विभागीय आयुक्त,
सर्व जिल्हाधिकारी,
मंत्रालयाच्या निरनिराळया विभागातील सर्व विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख,
* महालेखाकार, महाराष्ट्र-१, मुंबई/ महालेखाकार, महाराष्ट्र-२, नागपूर,
* अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई/ निवासी लेखा अधिकारी, मुंबई,
वित्त विभाग/ व्यय-४, विनियम शाखा, मंत्रालय,
उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग (उद्योग-६),
सामान्य प्रशासन विभागातील सर्व कार्यासने / कक्ष,
निवड नस्ती/ सामान्य प्रशासन विभाग/ जपुक (२९)

* पत्राने.